म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १३९५
१९५८

REFBK-0010562


बुलबुल
श्रीकृष्ण पोवळे

# बुलबुल

• • •

काव्याला संस्कार आणि तारुण्य यांचा परिणाम म्हणूनच कीं काय जळमातीचा कवि बराचसा स्वयंकेंद्रित आणि आत्मनिष्ठ आहे. अंतरंगांतील तीव्र संवेदनांनीं येथील कवितांचे स्फुरण होतें. या संवेदनांत महत्त्वाचें स्थान प्रीतीचें. त्यांतहि साफल्यापेक्षां वैफल्याचा सूर अधिक. पण त्यामुळें कवीच्या अनुभूतीला एक प्रकारचा सच्चेपणा येतो.

ज्या सौंदर्यनिष्ठेनें जीवनाची आणि निसर्गाची प्रीती स्फुरते-जिच्यामुळें वसुंधरेचें रूप ‘हे तर तुझेंच रूप विशाल’ ही भावना होते, ऋतु हे ‘पृथ्वीचे प्रियकर’ वाटतात, ‘माथ्यावरी विसावत छाया निळी नभाची’ कीं जींतून शांतीचा स्राव होतो, तिच्यामुळें जीवनानंदाची स्पृहा उत्पन्न होते. म्हणूनच श्री. पोवळयांच्या कवितेंत दिसणारी मधु–आसक्ती, भोगवाद निव्वळ विकारांतून अवतरलेला नसावा. यांत जीवनानंदाचा अंश आहे. ही अश्रद्धा खय्यामी मधु–आसक्ती आणि यांना छेदवत् असणारा मस्तपणा हे पोवळयांच्या काव्यवृत्तीचे विशेष आहेत. पण हा मस्तपणा जीवनांतील पारंपरीक श्रद्धा मूल्यें घसरल्याचा परिणाम आहे हें लक्षांत घ्यावें. म्हणूनच काव्यदृष्टया मोहक वाटणारी ही वृत्ति वैचारिक प्रगतीच्या दृष्टीनेही स्वागतास योग्य आहे.

सौंदर्य, रेखीव रचना आणि धुंद मोकळे उद्गार यांनीं अंकित अशा काव्यासक्त वृत्तीचाही प्रत्यय येथें आहे.

प्रो. गो. के. भट

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४

प्रकाशक—
शं. वा. कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार
गिरगांव, मुंबई ४

फेब्रुवारी १९५८

किंमत ३ रुपये

मुद्रक—
द. शं. पोतनीस
गांवकरी प्रिंटिंग प्रेस,
आग्रारोड, नासिक.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23026 विः काव्य
क्रमांक 9364 नोंः दिः 20/3/58

" उंच जाऊं दे तुझा स्वर याहुनी
मार्दवीं सारी झरू दे वेदना
एक एका या लकेरीच्या सवें
काळजाचें रक्त दे, दे चेतना."

चि. हेमंत पोवळे यांस—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23022 वि. कोटक
क्रमांक 9324 नों. दि. 20/3/58

# बुलबुल

रे मनाच्या बुलबुला तूं गीत गा
दुःख ही माझी गुलाबाची कळी
घे तिचा कांटा उरीं खुपसून तूं
होऊं दे अन् वेदना ती आगळी.

काळजांतुन रक्त वाहूं दे तुझें
वेदनेंतुन गीत वाहूं दे तुझें
ही कळी उमलून रंगू दे जरा
आणि गंधांतूनही स्वर येऊं दे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 10462
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

रे मनाच्या बुलबुला तूं गीत गा
गीत गा तूं, प्रीत गा, धुंदींत गा
काळजाला घट्ट कांटा रोवुनी
जीवनाचें, प्रीतीचे वैफल्य गा.

उंच जाऊं दे तुझा स्वर याहुनी
मार्दवीं सारी झरूं दे वेदना
एक एका या लकेरीच्या सवें
काळजाचें रक्त दे, दे चेतना.

उंच जाऊं दे तुझा स्वर या नभीं
शून्यतेची टाक भारुन हीं शिडें
गंध हा येईल तूझ्या मागुती
वाहुं दे हा मार्ग अज्ञाताकडे.

पाहिजे आतां कुणाला शाश्वती?
पाहिजे कोणास प्रीती वा प्रथा?
मुक्त गा तूं मृत्युला आलिंगुनी
पाहिजे आतां मनाला शांतता!

★

# हिरा

मातींतून उठलों मी
मातीचें भय न मला
खडकापरि मी अभंग
घावांचें भय न मला.

अग्नीमधिं मी न जळें
तापानें व्यय न मला
मी प्रकाश किरणांमधिं
विरघळतों– क्षय न मला.

तळपे मी तेजानें
ज्यांच्या शीर्षावरती
झळके मी रूपानें
ज्यांच्या वक्षावरती–

त्यांच्या सुखदुःखांचा
नच गंध, स्पर्श मला
मातींतुन आलों मी
मातीचें भय न मला.

बुलबुल

मी द्रवांत विरघळे न
रंगाशीं मी न मिळ
तेजाचा रस माझ्या
शरिरामधुनी निथळे.

सिंधूपरि मी अथांग
थांग न माझा मजला
मातींतून आलों मी
मातीचें भय न मला.

मज ओर्षा एकच
या सूर्याच्या किरणांना
फुलवुनिया, नाचवीत,
झुलवित न्यावें गगना.

लक्षावधि किरणांची
फुलवावी दिव्य फुलें
मातींतुन उठलों मी
मातीनें मी न मळे.

★

# यात्री

रोधिती मार्ग पान्थाचे तट पाषाणी
गिरिदरी गर्जते मस्तीच्या हास्यांनीं
व्यापाया चढती वरती शून्य नभाचें
या गिरिमालेच्या चढत्या अुंच कमानी !

खंबीर, क्रूर, अुत्तुंग प्रस्तरावरुनी
जायचें मार्ग हा अमर्याद वर चढुनी
गिरिमाला भंवती आणि मार्ग नच कोठें
दुबळे तर मरती येथें काळिज खचुनी.

जरि मर्द तरी हे अविचारीच प्रवासी
त्वेषानें घेती झुंज मत्त खडकाशीं
मानवी भावना कातळास या कुठुनी ?
जाणे न कुणी हा दुःखी, श्रांत, अुपाशी.

हे कुणी यांतले धूर्त अधिक व्यवहारी
भेदून जावया बघती क्रूर कपारी
घालिती घाव अन् अुडे दगड अेखादा
गिरि गिळितो यांना म्हणविति हे गिरिधारी.

बुलबुल

हे जगावेगळे निघती जग जाणाया
मेघापरि जाती वरती गिरि लंघाया
क्षण व्योम व्यापिती अिंद्रधनुष्यापरि हे
होतात अधोगत त्यजुन गिरिशृंगा या.

गिरिगुहेंत येथें हे अज्ञातच ज्ञानी
लावण्य निर्मिलें कातळांतुनी ज्यांनीं
वज्राला यांनीं मअु मेणाहुन केलें
अुठविली अहिल्या निजस्पर्शानें यांनीं !

अुठविणें अहिल्या जरि तुझिया न चरित्रीं
क्षण विश्रांति घे हृदया, तूं तर यात्रीं
निर्झराजवळ या बसुन पहा गिरिशोभा
तुडविणें चुके ना ही खडकाळ धरित्री.

★

# माती

ही एक माती नि ती एक माती

ती श्याम -- ही कैक रंगांत रंगे
साकार ही लेइ नाना स्वरूपें
उच्चासनीं हीज विश्राम लाभे.
ती पाहते मात्र स्वप्नें नभाचीं
ही एक माती नि ती एक माती.

तिला सूर्यतापांत लागे जळावें
तिला अग्निदिव्यांत लागे हंसावें
तिच्या फाळ फाडून काढी उराला.
हिला संगती मात्र त्या कंकणांची
ही एक माती नि ती एक माती.

हिला लाभती संगतीला विलासी
हिला लाभती आणि सेवेस दासी
हिला सभ्यता स्पर्शते मार्दवानें.
तिला संगती कर्दमाची, कृमींची
ही एक माती नि ती एक माती.

ही पेय वाही हिला द्याल जे तें
स्वतःला न घेई न कांहींहि देते
वंध्यत्व हीतें स्थितप्रज्ञता दे.
तिची प्यास संपे न वर्षामदाची
ही एक माती नि ती एक माती.

हिला चुंबिती ओठ– ही ओठराणी
तिला धुंद मायेंत आकाश न्हाणी
हिच्या संगतीं रंगतीं नाचगाणीं
तिचा गर्भ दे वेदना सर्जनाची
ही एक माती नि ती एक माती.

★

# अधराला अधर हवा

अधराला अधर हवा
एक हवा कर करांत
नजरेला नजर हवी
मिटणाऱ्या पापण्यांत.

वाम करीं धरलेली
हिमगौरी थरथरती
केशांचा बंध हवा
सुटलेला तनुभंवतीं.

पदर हवा ढळलेला
चळलेला वाऱ्यावर
ती विनम्र ताठरता
चु र ले ली वक्षावर.

तनुतनूंत बिजलीची
मृदुल धुंद लहर हवी
अन् उरांत धडधडत्या
चंचलता स्थिर व्हावी.

गालावरची लज्जा
विरणारी चुंबनांत
दृढता निःसंग हवी
दोघांच्या कंपनांत.

श्वासांतुन प्रीतीचें
आणि हवें आश्वासन
ढळणाऱ्या त्या क्षणांत
अ क्ष य ते चे सर्जन.

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23021 वि: ...
क्रमांक 23eu नों: दि: 2673/8

# आहे जीवन काय ?

आहे जीवन काय ? थांग न कधीं लागे न कोणासही !
पाषाणांतुन दोन घर्षुन अुठे अेका क्षणाची द्युती
सूर्याच्या किरणांतुनी अुमलते ही सप्तरंगी कमा
वज्राची कुसुमासवें मिळतसे याच्यामुळें संगती.

आहे जीवन काय ? होअिल थिटी याच्यापुढें कल्पना
आहे हें क्षणमात्र – हा क्षण परी धांवे पुढें अक्षय
चांचल्यांतुन स्थैर्य येथ मिळतें नाशांतुनि सर्जन
जाळी हें मदनापरी नि जळते होअी न याचा लय.

आहे जीवन काय ? जीवन असे ही अेक वारांगना
हिच्या क्रूर अुरांतला न सहसा जाणी कुणी आशय
त्याला प्रेम हिचें मिळेल अुठुनी जो आयु लावी पणा
त्याला भोग हिचा मिळेल, धरि जो हातीं हिला निर्भय.

आहे जीवन काय ? जीवन कुठें शब्दांत ये सांगता ?
हें अज्ञेय, अथांग, गूढ अितुकें जाणूं शके जाणिता.

★

बुलबुल

# वाद्य

केला कोण सफाईनें त्यांनीं त्यावर वार्
झाली स्तब्ध क्षणार्ध तरी शब्दाची विषधार्
तों आवाज क्षणीं दुसऱ्या उठला घुमत फिरून्
लाटांनीं गर्जत टाकी तुफान व्योम भरून्.

ते तर वीरच, वीरांनीं का घ्यावी माघार् ?
त्यांनीं अलगद सोलियलें चर्म कसें हळुवार् !
घोटुन आणि कमावुन तें केलें कापुन गोल्
कातड्यास त्या करकचुनी केला ताणुन ढोल्.

काय चमत्कृति वर्णूं ती टिपरी पडली अेक्
आणि मृताच्या शब्दाचे उठले नाद अनेक्
लक्ष कणांत फुटे त्याच्या शब्दाची जणुं कांच्
विरूप प्रतिबिंबांचीं अन् भुतें घालितीं नाच्.

ध्वनि-प्रतिध्वनि कांपविती नभ, सारा भूगोल्
बिशाद ये अैकूं कोणा खरा मुळांतिल बोल् !
बुद्धाचें अन् ख्रिस्ताचें चर्म न दे आवाज्
मूर्खांनो ! नाचा आतां वाद्य नवें ये आज्.

★

# श्रेय मिळे ना मजला

काय जगीं या माझें ? माझें कांहींच नसे
कवळूं बघतों जें तें, हातिं न कांहीं गवसे
धन माझें नच अिथलें, भोग न माझे अिथले
प्रत्यक्षच आज मला स्वप्नच्छाया भासे !

सखि, तूंही नच माझी, हे सुकेश नच माझे
वक्षस्थल, हे डोळे, हे कपोल नच माझे !
स्वप्नांच्या लाटा या, केवळ या भ्रमलहरी
माझ्या हृदयीं जरि या जळतें कांहीं माझें.

भंवतालीं शून्यें हीं घरदाराचीं शून्यें
प्रेयाचीं, श्रेयाचीं, सौंदर्याचीं शून्यें
–कांहीं शून्यें मोठीं, कांहीं शून्यें छोटीं
कांहीं स्वर्चापाचीं कांहीं मृण्मय चिन्हें.

कोणाचीं शून्यें हीं विश्वाच्या व्यापाचीं
त्यांत अहंता जळते मदमस्तीमधिं त्यांची
कोणाचीं शून्यें निज – कोशाच्या मापाचीं
गुदमरती स्वास्थ्यानें, शीतलता मृत्यूची.

कालाच्या शून्यतेस मात्र न कसली सीमा !
प्रबल अहंतेस अियें अंतीं विश्राम क्षमा
श्रेय मिळेना मजला जीवनामध्यें म्हणुनी
नचिकेतापरि द्वारीं तुझिया मी यमधर्मा !

★

# चारुतेचें स्वप्न

पायथ्याशीं सागराची धुंद व्हावी गर्जना
आणि शेजारीं असावी तूंच भोळी शोभना

कोर आकाशीं असावी वा असावी पौर्णिमा
सन्निधीं माझ्या हवी गे, मात्र तूं चंद्रानना

वायु लाटांशीं करो धिंगा करो वा ना मुळीं
तूं करावा लाजरें घेतां बळें मी चुंबना

गा तुझीं गीतें स्वतः धुंदीमधें अैकेन मी
आणि सुंदर त्याहुनी सांगेन तूंतें कल्पना

धुंद हो काव्यामधें तूं जा तरंगत रागिणी
काव्य मी जाणीन सारें वाचुनी त्वल्लोचनां

चिंतनीं मी गूढ माझ्या खोल कोठें वाहतां
स्पर्शानें तूं जाण मातें देअुनी आलिंगना

चारुतेचें स्वप्न राणी, तूंच याची कल्पना
तूंच दे साकारता माझी तुला आराधना

★

# लोकब्रह्म

होओी सम्यक विश्वदर्शन मला शांतीमधें माझिया
बाहू लक्ष, मुखें अनंत, अुठती ज्वाला शरीरांतुनी
नेत्रांतून अुठे तडाड तडिता आकाश फाडावया
भीष्म, द्रोण, कृपादि हे रगडले जातात दाढांत या.

होओी सम्यक विश्वदर्शन मला प्रीतीमध्यें माझिया
मी जाणे नच ब्रह्म आणिक दुजें या लोक-ब्रह्माविना
आकाशापरि छत्र हें धरि शिरीं ब्रह्मास या पूजितां
कालौघांतुन गर्जना करित दे हे अक्षयाची प्रथा.

कोणाचे व्यभिचार, हीन कुल या सर्वांस लाभे क्षमा
वाल्याचे करि खून माफ, कपटी कृष्णास दे गौरव
याला आदि न अंत, मृत्यु न जरा, सर्वत्र हें अक्षय
हें व्यापून जलस्थलास अुरलें आकाश व्यापावा.

मी अश्रद्ध तरीहि पूजित असे ब्रह्मा, तुला नेणतां
माझे लाख गुन्हे तुला न कळतां घेती तुझी मान्यता.

★

# अेका वेळीं अेक हवी मज

अेका वेळीं अेक हवी मज
तूं, मदिरा किंवा कविता
अेकांतावांचून न येअी
अेकीचाही रस लुटतां.

तुला पाहुनी, लाजलाजुनी
ही मदिरा कशि होअी लाल
मदिरेच्या सहवासीं सखि बघ
कवितेची लागे नच चाल.

मी म्हणतां कवितेच्या ओळी
विभ्रम मुद्रेवर तुझिया
तूं करितां कवितेचें कूजन
धुंद नुरे मदिरेला या.

बुलबुल

कविता, मदिरेच्या सहवासीं
हात कसा धरुं मी सुमुखी !
अेकीची फुलणार कळी पण
दुसरी कोमेजेल सखी.

अेका वेळीं अेक जरी सखि
दुसरी, तिसरी दूर नसे
अेकीच्या मुद्रेवरती मज
दुसरीचें प्रतिबिंब दिसे.

★

# जें न देखे रवी....

न रिघे येथें वायू सूर्या येशील कसा ?
शतकाशतकांत अिथें किरण स्पर्शले न तुझे
श्वासिला न वायूनें श्वास येथला कधिही
येथ तमाचें हिम हो किरणांवांचून तुझ्या !

सूर्या येशील कसा ? येथें पशुता नांदे
शय्येवरती विलास चालतात मरणाचे
प्राणांतिक हें हंसणें – रडतीं कबरेंत शवें
शोभा अिथली भयाण, मृत्यू येथें नाचे !

अंधाऱ्या या गुहांत, तम सूर्यापरि अुजळे
मूर्त तथागत येथें [पाषाणांमधुन अुठे
तम रंजित हो येथें, वाहे रससिंधु अिथें
कक्षा सोडून तुझी ये बघावयास रवे.

जेथ तुझी अनुभूति पोंचुं न शकते सूर्या,
माझें साम्राज्य तिथें, तेथें माझीच दया.

★

बुलबुल

# सखि तूं थांब जराशी....

सखि तूं थांब जराशीं !

तुझियावांचुन काय अर्थ गे
अिथल्या क्षुद्र विलासीं ? –

लौकिक, मदिरा, धन, रमणी ही
का गे तुल्य तुझ्याशीं ? –

चोथा भोगुन मी तुज वाही
रसघट हे अविनाशी –

शब्दाशब्दासाठीं तुझिया
मी नत तव चरणांशीं –

तुला ध्रुवपदीं बसवुनि करितों
मी मैत्री मरणाशीं –

तुझ्या अेवढें तेजस्वी मीं
देखियलें न प्रकाशीं –

निशांत तुजसम अन्य बिलगलें
नाहीं आर्त अुराशीं –

बाकी सारें धुकें अेक तूं
अुषा फुलसि क्षितिजाशीं –

मित्र तुझा हा धांवे मागें
सखि तूं थांब जराशी.

★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०४६२

बुलबुल

# ही वेदना

जें जें होय मला अतिप्रिय जगीं तें दुःख दे नेमकें
सौंदर्यामधुनी अचानक उठे हा शाप दैवा कसा ?
भव्योदात्त निसर्ग पाहुन बने मी मुग्ध वेडा पिसा
त्या माझ्या विकलस्थितीस न कसे कोणींच जाणूं शके ?

ही माझी कविता मला प्रिय असे प्राणाहुनी आणिक
जें कांहीं हृदयांत दिव्य स्फुरतें दे मी हिला अर्पुनी
माझें अैकुन गुह्य मत्त बनली ही होय का वैरिणी ?
सांगे दोष जनांत निःस्पृहपणें, ही देअि दुर्लौकिक.

माझा केवळ तो बहिश्चर असा आत्माच–माझी सखी
तीही होअुन संशयाधिन भ्रमे – साहूं कसें दुःख मी ?
हें काळीज फुटो न–आर्त हृदया हो तूं जरा संयमी
घे हें जीवन जाणुनी नच दुजें येथें तुला आणखी.

हे भोगी म्हणतात धुंद मजला यांना स्वतः सांग ना
सौंदर्या, तुजपासुनी मज मिळे रे काय ? – ही वेदना.

★

# लक्ष स्वप्नांच्या तळाशीं

लक्ष स्वप्नांच्या तळाशीं तुझें माझें ग मीलन
ग्रह–गोलांच्या युतींत लक्ष शून्यांचें नर्तन

दोन फुलांचे सुगंध अंतराळांत मिळाले
इंद्रधनुष्याचें टोक दुज्या क्षितिजा स्पर्शलें

सिंधूतळींच्या मोत्यांचा कर स्पर्शला शुक्राला
दोन दिशांचे प्रवाह अेका मिळाले सिंधूला

दोन क्षितिजांचें झालें शून्य व्योमांत मीलन
दोन निद्रांत जहालें अेका स्वप्नाचें सृजन

अुषःस्वप्नांत जहाली चंद्रकिरणाची भेट
अेका पाटीवर झालें दोन शून्यांचें गणित

अेका वेळींच वेधिति दोन दृक्क्षेप व्याधाला
अेका प्रवाहीं वाहती दोन दीपकांच्या माला

बुलबुल

दोन शब्दांचें संगीत एका लयींत  नाचलें
हात हातांत  घालून शून्य-पंथास निघालें

लक्ष स्वप्नांच्या तळाशीं तुझें माझें ग मीलन
ग्रह-गोलांच्या युतींत लक्ष शून्यांचें नर्तन

★

# घाट

गर्द धुक्यांतून अिथें
अुठती गिरिचें माथें
लपलेली रात्र कुठें
दरिदरींतुनी वर ये.

वाटे नभ ये खालीं
भूमीला कुरवाळी
फुलली गालास खळी
धुंद धुक्याचीं वलयें.

सोडुन गांभिर्य संथ
बनलें नभ मत्त धुंद
सोडी भूकेशबंध
वरती अुधळून फुलें.

विसकटले हे सुकेश
अंके नच बालिकेस
कवळी अिर हें धरेस
कटिला वेष्टून बळें.

व्योमानें करून त्वरा
अधर भिडविला अधरा
बावरुनी जाय धरा
अं ग ही श हा रें

तोंच निघें व्योम नील
भूचें घेऊन शील
घालित बेहोष शीळ
दू र तें भ रा रें

★

# आहे जीवन काय ?

आहे जीवन काय ? जीवन असे ही वन्ययोषा कुणी
शब्दामाजि हिच्या न अर्थ, न कळे भाषा न माझी हिला
भ्रूभंग, स्मित, विभ्रमांतुन तरी दे सूचना प्रीतिची
दृक्क्षेपें स्थितप्रज्ञता चळविते नादाविते ही क्षणीं.

मीं ओष्ठद्वय चुंबिलें समजुनी कीं लाल ही वारुणी
होओ शब्द हिचा निगूढतर अन् मी संभ्रमानें चळे.
मीं नेत्रद्वय चुंबिलें नयनींचा गूढार्थ जाणावया
धुंदीनें पण – मी कवेंत कवळी हो बद्ध आलिंगनीं.

ठेवी मस्तक आणि ताठर हिच्या वक्षावरी धुंदुनी
कांहीं हृद्गत तें कळेंच न मला, लाडांत ही बोलते
आवेगांत मला उरीं कवळिते ही चुंबिते, ग्रासिते
ये शब्दांत विचित्र बोध क्षणि या, ये क्रूरता लोचनीं.

वेढी गाढ सुषुप्ति तूं कवळिशी कां व्यर्थ गे वैरिणी ?
ये गूढास सुबोधता हळुहळु निःशब्द अंत्यक्षणीं.

★

बुलबुल

# ज्वाला

कशाला कुणीं यज्ञकुंडास माझ्या –
न मी मागतां धुंद ज्वाला दिली
हविर्भाग मी, यज्ञवेदीहि मी –
ऋत्विजांची स्वतः गात मंत्रावली.

निळ्या, तांबड्या, केशरी, पीत ज्वाला –
अुफाळून रंगांत गाती स्वतः
नि शून्याकृती होअुनी नाचती –
पावती अंतराळामधें शून्यता.

दिला स्नेह मीं यज्ञकुंडास सानंद –
त्यावीण नाचेल ज्वाला कशी ?
दिली प्रीत मीं, अन् दिलें गीत मीं
त्याविना रुद्र गाअील गीतें कशीं ?

प्रथा वाहिली सर्वथा नग्न होअून –
नाहीं पुढें पाहिलें मागुती
हिला तोषवायास मी भोग भोगी
हिला चंदनी अिंधनें लागतीं.

नको सत्त्व पाहूंस तूं यज्ञज्वाले –
जळूं लागलें आज अंतस्तल
मला दुःख त्याचें न जावो कुडी –
काय यानें तरी शांत हो स्थंडिल ?

नसे कामना – याच रक्षेंतुनी मी
अुठावें नवें घेअुनी जीवन
अपेक्षा नसे – ओजगर्भातुनी या
मिळावें कुणाचें मला दर्शन !

मला माहिती कीं, हविर्भाग मी –
यज्ञज्वालाहि मी आणि यज्ञेश मी.
जिथें पोंचती शून्य ज्वाला अनंतांत –
त्याची असे शून्यता, अंत मी.

★

# मला छळाया

मला छळाया रूप दिलें तुज आणि दिलें मज अंतरही
कवेंत येअि न ही सुंदरता – मीलनांतही मी विरही
तुझिया कचबंधावर माझे भ्रमर होअुनी मन भ्रमतें
तुझ्या मुखावर मन गंधापरि मत्त होअुनी दरवळतें.

तुझिया शब्दांतील नाद मज वरवरती झुलवी, फुलवी
स्नेहमयी नजरेंतुन न कळत शर माझ्या शिरती हृदयीं
जवळीं येतां तूं स्वप्नापरि – स्वप्नांचा का स्पर्श मिळे ?
दूर निघे तों तुझीच प्रतिमा ज्वालामय हृदयांत जळे.

स्वप्नें बघतों मी दिवसां अन् स्वप्नें बघतों मी रात्रीं
न कळे स्वप्नावरी तरंगत हा जाणार कुठें यात्री ?
अेक कळे मज मी जळणारा, धगधगणारी ज्वाला तूं
दृक्‌शर पंजर, अिच्छामरणी मी सखि तूं माझा मृत्यू !

★

# मृत्यू येशील कसा ?

मृत्यू येशील कसा ? ये होउन मधुरमणी
पीत अुषाऽनिल हळु हळु निळसर शून्यामधुनी
माझ्या निद्रेमधुनी सरतां सरतां रजनी
मृत्यू येशील कसा ? माझ्या स्वप्नांमधुनी !

प्राण हवे असतिल तर होअुन ये मधुराणी
स्तनकुंभामधिं अपुल्या घेअुन ये विष भरुनी
सर्वांगीं मृदुल असें वज्र कांचनी असुं दे
आण लपवुनी ज्वाला दाहक ओंठामधुनी !

मायाजालापरि तव केशांचा पाश मला
मद्यानें थबथबली नेत्रीं असुं दे चपला
हालाहलमिश्रित तो जिव्हाग्रीं मधु असुं दे
कणकणांतुनी तुझिया दे सखि मधुगंध मला.

आलिंगन देतां तूं कडकडुनी वज्राचें
झगडुन विषकुंभाशीं प्राशिन मी विष माझें
डोळ्यांमधली चपला शीर्षीं माझ्या जळतां
धुंदीनें मी अुठेन मरण चुंबण्या माझें.

बुलबुल

ओठांनीं जाळ, जळत जाउं दे आग अशी
जिव्हाग्रावरचा मधु प्राशिन मी त्यासरशीं
त्याच क्षणीं तूं अुरास वज्राची मार मिठी
धुंदीच्या लाटांचें वादळ अुठुं दे शीर्षी.

धुंदीच्या लाटेवर प्राण वाहतां माझे
लहरी लहरीसरशीं सर्व संपतां 'माझें'
प्राण सखे श्वासुन घे, चुंबुन घे ओठांनीं
भोगियलें जीवन मीं मरण भोगितां माझें !

★

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम 23028 वि: 3104
क्रमांक 23e4 नों दि: 28/3/

# हेमंत

व्योमांतून सुनील धुंद अुसळे लाटांसवें कौमुदी
या थंडींत करीत निःश्वसन ही माझ्यासवें शांतता
व्योमीं पांडुर दोन मेघ अपुल्या धुंदीमधें चालती
गेलें गोठुन चांदणेंच अथवा हें सांडतां सांडतां.

हेमंतांतिल वायु आणित असे हा गंध तृप्तीसवें
हा हेमंत न, दग्ध मन्मथ अुठे शीतांग की होअुनी
दोघांची किमया विलक्षण पुन्हां सृष्टीस दे जीवन
येतां यांतिल कोणिही थरकती रोमांच गात्रांतुनी.

छाया आणि प्रकाश यांसम असे हेमंत हा मन्मथ
अेकाला प्रिय वस्त्र, हा न मुळि ये वस्त्राविना भोगितां.
अन्यानें तर घेतलें जणुं असे निर्वस्त्रतेचें व्रत
पुष्पांचा करि ध्वंस अेक, दुसरा हा पुष्पधन्वा स्वतः.

दोघांनाहि परंतु अेक समयीं स्वच्छंद भोगायला
या वेळीं सखि पाहिजे कुणि तरी गौरांग वा श्यामला.

★

बुलबुल

# नको कसें म्हणेल काम ?

नको कसें म्हणेल काम भोग भोगणार जो ?
नको कसा म्हणेल घाम मद्य सेवणार जो ?
नको कसें म्हणेल धाम सेवणें जया रती ?
कुणी नको मधू म्हणेल जाणितां अशाश्वती ?

कुणी हवी कसावया जमीन अंग मोडुनी
हवेत घाव द्यावया घणास घेउनी कुणी
कुणी विणावयास वस्त्र बांधण्या घरें कुणी
श्रमावया हवेंच शीत, ऊन, पावसांतुनी.

हवेत विश्व निर्मिते विशाल कल्पनेंतुनी
हवेत सत्य जाणिते निगूढ चिंतनांतुनी
अथांग सिंधुच्या तलासमान गाढ शांतता
न बंध येथ कोणताच लादल्याविना स्वतः.

नकोत देश, धर्म वा कुणी नकोत शासितें
नकोत पंथ, धर्मग्रंथ वा नकोत दैवतें
न ओश्वराविना तगेल काय ही वसुंधरा ?
करून कष्ट भोगणार आमुची असे धरा.

असोत आपदा अनेक फत्तरापरी पुढें
पुढें पुढेंच चालणें न देह जोंवरी पडे
थरारत्या करांतली मशाल पेटवून घे
न मृत्यु मालवूं शके प्रकाश हा युगें युगें !

पुनश्च कष्ट संपतांच नाचुं द्यात कंचनीं
पिऊं मधू भरून पात्र सांडवीत कांचनी
विराग येउं दे खुशाल राग सर्व भोगितां
नयेअि भोगिल्याशिवाय जीवनास जाणिता !

★

# माझी सखी अहंता

हृदयांतलें हलाहल कां शांतवावयाला
नागीण ही मदोन्मद – माझी सखी अहंता

वक्षावरी विसावुन दे गारवा जरा ही
घाली हळूच फुंकर वारावयास चिंता

येतां अपेश दारुण नैराश्य केधवां ये
तेव्हां फणेंतला मणि दे आंध्य आसमंता

जातां यशांत गुंगुन दे फांस ही गळ्याला
द्याया नवीन भूधन नेऔ मला दिगन्ता

हो मानखंडना जर त्वेषांत डंखते ही
ठेवी सदैव अुन्नत धुंदींत तर्र माथा

कोणास ही भिऔ नच सर्वांस तुच्छ लेखी
सामर्थ्य मूर्त हें जणुं आव्हान दे कृतान्ता

नेऔ मला हळूहळु वाऱ्यावरी कुठें ही
ही चेतवी सदोदित चुंबावया अनंता.

★

# ये

देशि न संदेश केंवि अेकही ?
मिळती दुरुनी तुझीं स्मितें सखे.
जाणिव याची परंतु ठेव तूं
मृगजळेंहि हा कवि पिअूं शके.

तळमळतो निशिदिन मी प्रेयसी
जीवन हें होय विषासारखें
लज्जेनें, भीतीनें गे तुझ्या
अंतीं होणार काय पारखे ?

विव्हल तूं होसी माझ्यापरी
साहतों म्हणून वेदना सुखें
शालिन तूं लपवितेस भावना
ठेवितेस गीत प्रीतिचे मुके.

लज्जा, भय सोडुन संकोच दे
प्रीति – गीत मुक्त गाअि सारिके
शिपल्यास स्वातीजल लाभलें
अजुनी देशी न केंवि मौक्तिकें ?

क्षितिजाची कड फुलवित ये अुषे
जलधारेपरि शीतल ये निकें
वायूपरि नकळत, द्रुत ये अिथें
मृत्यूपरि ये अचूक ये सखे.

★

# वादळ

अुठें मी महासागराच्या कुशींतून –
मस्तीमधें झेंप घे भूवरीं
दऱ्या आणि खोऱ्यांतुनी मी भ्रमें –
गात वेळूंतुनी वाजवी बांसरी.

नदीशीं करी केधवां प्रेमलीला –
तिला नावरे आपुली भावना
तिच्या खेळुनी अंचळाशीं निघें मी –
मिळेना कुठें स्थैर्य माझ्या मना.

गिरीच्या शिराशीं कधीं मत्त हत्ती –
परी झुंज घेअून मी खेळतों
कडाडून मेघांस अन् अेकमेकां –
वरी घर्षुनी नाचतों, धांवतों.

बळें चुंबितां कोपुनी तत्क्षणीं जाय –
माझ्या मिठींतून विद्युल्लता
विलासी नि अुन्मत्त मीही नि तीहि –
नि दोघांतही धुंद निःसंगता.

फिरे मागुती प्रेमवेडीच वर्षा –
तिला चैन कोठून माझ्याविना ?
तिचे हात हातांत– घेतां क्षणीं रंग
माझ्या निराळाच ये नर्तना.

असें स्वैर हें चित्त माझें स्थिरेना –
कुठें प्रेय ? निःश्रेय का जीवन ?
अुषःकाल झाला न तों जाहलों मी –
विचारामुळें या अशा अुन्मन.

नदीच्या तटानें असा हिंडतांना –
कळी देखिली अेक मीं कोंवळी
तिला पाहतां श्रेय माझें मिळालें
मला पाहुनी आणि ती हांसली.

तिचा गंध कांपीत गेला जिव्हारीं –
असा विद्ध झालों न केव्हांच मी.
असा गंध मीं सेविलेला जरी अेक–
रात्रींच बेभान वर्षा गमीं.

तिला बोललों प्रीत देशील का तूं ?
तुला देअुं का मी दृढालिंगन ?
तुझ्या पायिं सर्वस्व मी वाहतों गे
तुझ्याविण साहे न हें जीवन.

मला बोलली कांपुनी ती भयानें
" तुझी आणि माझी न प्रीती जुळे
दृढालिंगनानें धुळीलाच जाणार
वायो ! न का अंग हें कोंवळें !

तुझा स्पर्श मृत्यूच माझा सख्या
सांग निर्माल्य देणार प्रीती कशी ?
तुला वाहतें गंध-प्रीतीच माझी
दृढालिंगना घे दुजी प्रेयसी."

निळ्या सागरांतून आलों नि आतां –
निघे जावया नील शून्यामधें.
तुझ्या मीलनाची न आशाच केव्हां
तुझी प्रीत नाहींच दैवामधें.

अिथें काय माझें ? भ्रमिष्टापरी मी –
निघें घेत धुंदींत आवर्तन
तुझा गंध माझ्या अुरीं या जळें हें–
सये, जन्मजन्मांतराचें ऋण !

★

# मधुवर्षा

हाय कुठें तूं या हृदयाची राणी
मला झुलविसी मृगजळ होउनि तूं कां ?
दिससि शिपभर रमणिलोचनीं किंवा
गालांवरतीं ओठीं अेकच घुटका.

काम माझिया सखिच्या नयनांमधला
गालांवरुनी लाल ओघळुनी आला
म्हणुन लाल ही माणकापरी मदिरा
म्हणुनी धुंदी मादकता मद्याला.

गंध केशसंभारामधुन तुझा ये
स्पर्श तुझा दे मृदुता पुष्ट स्तनांची.
चुंबनामधें दाहकता तव जाळी
रतिसंगामधिं मिळे अेक मधुवीचि.

शांति मिळेना मला तुझ्याविण पोरी
हृदयस्थाला या न मिळे विश्राम.
मी तळमळतों, तगमगतों दिनरजनीं
या वसुधेला आज न अुरलें व्योम.

सिंधुतलांतुन ये अुसळुन ये वरती
भरुन अुषेचे प्याले पुरव मनीषा
दाहि दिशांतुन, क्षितिजामधुनी ये ये
व्योमामधुनी होअूं दे मधुवर्षा !

★

# कधीं

थंड हवा भोंवती सदा हवी
तप्त तळपता कधीं हवा रवी.
थंडीची वा ढ वा व या मजा
आंच कडकडून एकदां हवी.

हर्ष हवा जीवनामधें कधीं
शोक हवा जीवनामधें कधीं
हर्षाची वा ढ वा व या मजा
धुंद वेदना उरीं हवी कधीं.

मधुची धुंदी हवीच नेहमीं
आकंठच केधवां कधीं कमी
मधुची या वा ढ वा व या रुचि
शांती हृदयीं नितांत विश्रमीं.

शृंगाराचा हवा हवा मजा
विरहाची केधवां जरा सजा
काम कामिनी सवें लुटावया
वैराग्याची कधीं हवी रजा.

क्षुब्धताच जीवनामधें हवी
विश्रांती आणि केधवां हवी
जीवनास पूर्णतः लुटावया
मृत्यूची भेट एकदां हवी.

★

# जलचक्र

रे मरणाहून भयंकर हें !

जलचक्रापरि फिरतें गरगर भयकर ओढी जीवन हें
दुरुनी दिसतें कमल–जलाचें जीवन मृत्यूचें मुख हें

ओढी, चुंबी, कवळी कोणा लाटेंतुनि सुटतां नच ये
या वेगार्नांधि फिरणाऱ्याला वाटे फिरवी तोच स्वयें

पाण्यावरती लिहिती अक्षर लाटेमधिं तों लाट मिळे
कमलदलांतुनि मधु गळतो पण त्याचा दुरुनी वासच ये

लाटांचें हें चक्र मनोहर क्षणभरही नच बघतां ये
खोल खोल हा जाओ केव्हां जाणिव त्याची त्यास न ये

जलचक्राची अथांगता कुणि सांगाया परतून ये
ओलांडूं वा शके न कोणी या जलचक्राचीं वलयें.

☆

# मैत्रिणि तूं केव्हांही ये

मला मिळाला तुझा अिशारा, मैत्रिणि तूं केव्हांही ये.
ये रतिसंगीं वा मधुरंगीं, भर दिवसां, रात्रीची ये.

सुखांत असतांना सखि ये तूं, वा असतां शोकीं, विरहीं
अेकदांच येणार क्षणाची या यात्रीच्या भग्न गृहीं.

तुझियासाठीं रसभोजन हें ठेवियलें तनुपात्रीं या
रंग ठेविले, छंद ठेविले, या नेत्रीं अन् गात्रीं या

आणि फुलांचा हार गुंफिला वाहाया तुझिया चरणीं
पुष्पें जातिल तुझियासंगें गंध असो वातावरणीं.

तुझिया कोमल गोर करांनीं घे ओढून माझ्या हृदया
हा जळणारा शांतव अग्नी वर्षुन शीत अनंत दया.

शृंगाराला मी न भिणारा तूं तर अंतिम प्रेयच गे
जीवन मजला प्रिय तुजलाही—जीवन माझें प्राशुन घे !

★

बुलबुल

# मधु विरही

जीवनांत या सत्य अेक ही धुंदी,
जीवनांत या श्रेय अेक ही माध्वी !
म्हणोत हिजला चंचल वा व्यभिचारी
जीवनांत या प्रेय अेक ही साध्वी.

या मधुवांचुन सुटे न कर्मफलेच्छा
या मधुवांचुन स्फुरे मुखीं नच गीता
व्यासोच्छिष्टित जर का ही मधु नसती
तर व्यासाचा रस–सागर हा नसता.

मज गीतेचें रहस्य कळुं दे, न कळो
तरिही कृष्णा तुझें गुह्य मी जाणें
सहस्र नारी भोगाया या लोकीं
मधु प्राशाया हवीच प्राणपणानें.

★

# चुंबिसि तूं अनलासी

अटकर बांधा तुझा ग पोरी
झुलविसी कमर जराशी
हांसत थोडें, लाजत थोडें
धरिसी पदर अुराशीं.

काजळ कांठामधून तिरपी
नजर न जहर विलासी.
अुगाच अपुला फिरविसि वरवर
कर कोमल कचपाशीं.

डोळ्यांमधुनी हळुच धिटाअी
शब्द अडे अधराशीं
अजुनी कमळें अर्धोन्मीलित
हृदयीं मदनविकासी.

तूं मानेला देतां हिसडा
आमंत्रण प्रलयासी
हृदया माझ्या सावध अजुनी
चुंबिसि तूं अनलासी.

★

# चंचल सखी जीवन

चंचल सखि जीवन तुझियापरी
चंचल तुझिया सखि नयनांपरी
वक्र असे भ्रकुटीसम हें तुझ्या
निम्नोन्नत तुझिया केशापरी.

कुटिल असे केशासम हें तुझ्या
सरल असे नासेसम हें तुझ्या
जीवन भाळापरी विशाल गे
ओठांसम रंगित रंगे तुझ्या.

ओठांसम जीवन आहे तृषा
श्वासासम सातत्याची स्पृहा
दौहृदिनीं द्व्यर्थी तुझियापरी
अर्थ तयाचा निघे हवा तसा

चारित्र्यासम तव अज्ञेय हें
अन् शाश्वत प्रीतीअितुकेंच हें
हें कठोर तुझिया वक्षापरी
चारुतेपरी तुझिया धुंद हे.

जाणिसी न तूं स्वतःस गे जशी
जीवनास जाणिव नाहीं तशी
सत्य नको जीवनास वा तुला
नग्नतेपुढें न ठरे अुर्वशी.

—

माझ्यासम कोणी भोगी खुळा
जाणुन घे जीवनास अन् तुला
सांगुं नये तें रहस्य सांगुनी
रुष्ट करी जीवनास – प्रीतिला.

★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५६२
ग्रंथ शाखा प्रत

# कांचन

हवेंच अग्निमार्जि या जळावयास कांचना
जळो जळावयास योग्य – तूं परंतु हांस ना
चुकायचें न हें अतां, वृथा कशास भीरुता ?
प्रकाशुं दे तुझ्या कणाकणांतली सुवर्णता.

तुला मिळे जळामधें असीम शांतता अशी
कधीं न संपणार हें असेंच काय मानिसी ?
तुझ्या सुकांत मार्दवास जागवावयास हें.
न मोक्ष हा तुझा – तुला अिथून जावया हवें.

मिळे दुज्या क्षणींच घाव अैरणीवरी तुला
नवीन घाव देतसे नवीच चारुता तुला
कुणी तुझी पिळून तार काळजास काढिली
तुझी मलीनताही अग्नीच्या द्रवांत क्षाळिली.

बने, तुझी अलंकृती – प्रभा द्रवे तुझ्यांतुनी
तुझ्याविना न शोभवील वक्षभाग मानिनी.

★

# कशी सांग येऊं ?

कशी सांग येऊं लेवूं साज मी कशाचा ?
मला थांग लागे ना रे तुझ्या अंतराचा !

—

कौमुदीचें रेशमाचें वस्त्र अंगीं माझिया
कृत्तिकांची कर्णभूषा शोभते कानीं प्रिया
सिंधुच्या लाटा रुपेरी पैंजणें पायांत या
मी अशी नाचे पिशी हा नाच माझ्या प्रीतीचा.

—

केश काळे दाट माझे सोडुनी मी मोकळे
चांदण्यांची वर्षली अंगावरीं माझ्या फुलें
दाह माझा हा शमेना अंतरीं देवा जळें
सोडुनी निश्वास शोधी श्याम माझ्या स्वप्निचा.

—

मी उषा होऊन आलें लाल कोमल लाजरी
घे मला नारायणा, ओढून घे आतां उरीं
लाजुं दे मी, घे बळानें ओढुनी ही नोवरी
मी हंसे नाचे जळे रे गात प्रीतीची ऋचा.

★

# हळूंच

हळूंच येऊनी उभी समोर राहिलीस तूं
हळूंच बोललीस तूं, हळूंच हांसलीस तूं.
समोर पाहिलें – कशी उषा अवेळ हांसली !
नि मानसांत लक्षबिंब बिंबुनी प्रकाशली ?

खटयाळ कांहीं बोलतां खळाळ हांसला झरा
विनोद, काव्य यामधें प्रवाह वाहला जरा
हळूंच बोललीस तूं 'तुम्ही न थोर का कवी ?'
अजून बोल हा तुझा स्मरे – मनास तोषवी.

न धीर हो तरीहि पाहिलेंच – मीही लाजरा
तुझाहि शब्द गद्गदून हो क्षणार्ध कांपरा
क्षणार्ध अेक आणखी दिसे मला तुझ्या मुखीं
विलोल, दिव्य, कांहिसे – क्षणांत रोधिलेंस कीं.

तुला स्मरे न आज हें – मला पटे न आजचें.
खुळ्यास या मला कुठून सत्य आकळायचें ?
तुलाच विस्मरावया कितीक धुंदती निशा
तुझ्या स्मृतींत रंगती नि भंगती किती उषा.

★

अनुक्रम 23021 ... संग्रहालय, ठाणे.
क्रमांक ९३६४ ... दि: ... नों: दि: ...

# रूपाची परिपूर्णता

रूपाची परिपूर्णता नच कुठें याहून मी पाहिली !
गौरांगांतुन कांति ही अुजळली, सर्पाकृती सौष्ठव.
मुद्रा ही सुकुमार सुंदर, किती रेखीव हें मार्दव
ही स्नातांग अुषा प्रसन्न, पहिली वेदांत जी वर्णिली.

मोत्यांचे सर हे सुबद्ध तुझिया या केशबंधावरी
केशांचा रस श्याम प्राशुन मिळे कां तेज यांना असें ?
कांतींतून तुझ्या न कांचन खुलें हें क्षुद्र निस्तेजसें
सामावें सगळेंच सुंदर कसें, संध्या – अुषा – शर्वरी ?

गंधाची जणु मंद लाट अुठते – हें आर्जवाचें स्मित
श्रद्धेचीं वलयें अथांग तुझिया नेत्रांमधें दाटतीं.
हें माधुर्य असीम शब्द कुठल्या वीणेंतली झंकृती ?
येअी स्वप्न समोर काय ? बघतों होअून मी विस्मित.

सौंदर्या ! तुजला न येअि धरितां शब्दांत, रंगांत वा
कालातीत तुला न मी करुं शके – ही खंत माझ्या जिवा.

★

बुलबुल

# राजीव ते लोचन

कोणाची हिमगौर कांति बघुनी मी धुंद झालों क्षण
कोणी लाडिक, अुंच, रेखिव कुणी, श्यामा कुणी रेशमी.
कोणाचे स्तनयुग्म भारिति मला, मी विस्मरें मीपण
काळा कुंतलपाश मोहवि मला पाशामधें बद्ध मी.

कोणाचें मृदुहास्य, चाल अथवा पाहून हंसीसम
माझी चंचल दृष्टि हो स्थिर जरा सौंदर्य तें पाहुनी.
लज्जामुग्ध कुठें बघून युवती किंवा कुठें विभ्रम
मी आसक्त न तृप्त होय मुळिंही ती चारुता प्राशुनी.

'सौंदर्यावर भृंग नाचसि कसा तूं लुब्ध माझ्यावरी ?'
आहे प्रश्न खराच हा न तुजला मी श्यामले आकळे.
अंत:सिंधु नितांत शांत, न रिघे येथें कुणी अंतरीं
या पृष्ठावर नाचुं देत लहरी किंवा कधीं वादळें.

मातें आज सये हवेत असले राजीव ते लोचन
अंत:सिंधुहि तर्र जे अुठविती, लाटा तळापासून.

★

# दे तो हात करीं

गे माझ्या रसिके तुला करितसे माझी कला अर्पण
तूं काव्यावर लुब्ध या, प्रिय असे का गे कवी शोभने ?
माझ्या धीटपणास तूं कर क्षमा, होवो तुझा क्षोभ न
गे होवोत कठोर ना मजवरी प्रेमार्द्र तीं लोचनें.

मीं तेव्हां म्हटली सभेंत कविता जी होय तूंतें प्रिय
तूं होतीस समोर फक्त न कळे मीं काय अुच्चारिलें.
काव्यीं काजळकांठ वर्णित तुझे, निर्व्याज नेत्रद्वय
हे संकेत तुला न काय रुचती ? किंवा न तूं जाणिले ?

माझी होशिल काय ? सांग रसिके मी तूज पृच्छा करी
का तूं शांतविशील श्वासुन अुरीं हे अूर्मिले वादळ ?
प्रीती काय मला न आजहि कळे मी अेकला भूवरीं
का तूं देशिल स्फूर्ति ? काय प्रतिभा होशिल तूं अुज्ज्वल ?

दे तो हात करीं सलज्ज असुं दे निष्पाप ते लोचन
किंवा मानसि मानिनी अलग तूं काव्याहुनी जीवन ?

★

बलबुल

# काष्टांतून उठेल अग्नि

कां तूं स्तब्ध ? तुला न काय रुचली माझी प्रियाराधना ?
माझी चूक असेल गे तर तुवां मातें करावी क्षमा.
मी तों अुन्मन, धुंद, कोठुन मला वाटे जगाची तमा
तूं शालीन, कुलीन जाणुं न शके गे मी तुझी भावना.

मीं तूंतें दिधलें अुपायन नको अव्हेर त्याचा करूं
माझें अंतर शुद्ध, सुंदर नको देअूं अशी वेदना.
हें तों लांच्छन पौरुषास म्हणुनी माझी तुला प्रार्थना
हें निष्प्रेम जिणें असह्यच अधिक्षेपें नको तूं करूं.

मागें – जें नच मागुनी मिळतसें – जें दिव्य अूर्जस्वल
त्याचा देवि तुझ्या अुरांत न फुले स्फुल्लिंग का अेकही ?
यानें मी जळतों अशान्त – जळुं दे मी आज सर्वस्वही
त्वत्प्रेमाविण शून्यवत् मज गमे हा रम्य अूर्वीतल.

प्रीती आणि असेल अंतरिं तुझ्या, गे सोड तूं भीरुता
काष्ठांतून अुठेल अग्नि सखि तूं माझ्यांत सामावतां.

★

# ये माझ्या कविते

ये माझ्या कविते, सुनीत प्रतिभे ये येथ तूं मागुती
तूंतें पाठविलें स्वतः सखिकडे सांगावया हृद्गत
ये येथें परतून तूं जरि गडे झालीस मर्माहत
गे तूझ्याहुन वेगळी मुळिं नसे माझ्या मनाची स्थिति.

मी माझ्या म्हटलें मनांत कविता ही चित्रलेखा स्वतः
का माझे अनिरुद्ध भाव सखि ही दावील ना रेखुनी ?
गेलों मोहुन धुंद होउन अुषःस्वप्नामध्यें रंगुनी
तो वक्षीं पदलांच्छनेंच मिळतीं, येतीं न जीं दावितां.

माझें जीवन क्षुद्र, प्रीत न मिळो – प्रीती न ये आर्जवें
हा आघात परंतु व्यर्थ तुजला मर्मान्त माझ्यास्तव.
हा माझ्या रसिकेकडून कविते व्हावा तुझा गौरव ?
दुर्दैवास बघून सांग नयनीं रोधूं कशीं आंसवें ?

गे माझ्या कविते, कुठें सखि असे सामर्थ्य तूझें महा ?
कीं स्वार्थास्तव योजिला म्हणुनिया निःसत्त्व हो मंत्र हा ?

★

बुलबुल

# व्योमाच्या हृदयांत शल्य रुतलें !

या तीरावर, कातळावर बसे – येथें अुदासीनता
संध्येचे मधुराग संपुन अतां, ही पातलेली निशा.
खालीं ओहळ क्षुद्र वाहत असे – सोडी न हा संथता
सारे श्यामल आणि धूसर – चढे माझ्या मनाला निशा.

येअी शीत समीर घेअुन सवें रानांतला गंध हा
या माळावर लोळतो गडबडा अन् स्तब्ध होअी जरा.
आकाशांत न चांदणें अजुनिही – किंवा शशीची कला.
मी पाण्यावरचा तरंग बघतों हा धांवता, नाचरा.

हो झाडींत विलीन डोंगर दिसे हे शृंग त्याचे वरी
व्योमाच्या हृदयांत शल्य रुतलें असें मला भासतें !
काळे सोडुन केश दे विरहिणी शोकार्त ही शर्वरी
ठेवी दाबुन वेदना हृदयिंची सांगे न हीं हृद्‌गतें.

त्या तीरावरुनी कुणी अुडत ये हें अेकलें पांखरूं
होअी धस्स अुरांत – ये सय तुझी – कैसे मना आवरूं ?

★

# तें मृत्यूपरि गूढ

" हो पत्रास विलंब – होओील क्षमा – निःशंक मी याचितां
या स्नेहार्द्र मनास मी पण वृथा देवा दिल्या यातना.
मातें गौरविलें किती पण तुम्हां यावी कशी कल्पना ?
काव्यात्मा तुमचा नि अेक कुठली सामान्य मी क्षुद्रता.

आहें मी तुमचीच आपण मला आज्ञा हवी ती करा
सेवा घ्या समजून शिष्य अथवा – द्या जीवना सार्थता.
किंवा मैत्रिण मानिलीत तर ती मातें किती धन्यता !
या वैवाहिक बंधनास पण ही व्हावी अशी कां त्वरा ?

संपे आमरणान्त जें न असलें देवा दिलें कां ऋण ?
कां चैतन्यमयी शिळेस करुनी रामा तुम्ही याचितां ?
आहे जीवन थोर हें मजमुळें येवो न या रुद्धता
हा मातीस मिळे सुगंध जर मी काव्यास या कारण.

भार्येचें अपुल्या जमेल न गमे का कोण तें जीवन
तें मृत्यूपरि गूढ ओढित मला – जाणाल का मन्मन ? "

★

# या जन्मीं न पुनश्च

माझी चूकच ही कशास फुलली प्रीती मनामाजिं या ?
तूंतें अर्पियली कशास ? लिहिलीं काव्यें कशाला वृथा ?
प्रीती या हृदयीं परंतु न शके जिंकूं अहंकारिता
साधिक्षेप म्हणून तूं अुधळशी प्रीतीस या लीलया.

प्रीतीची मजला न माहित असे ती संस्कृति कोणती ?
तूं मातें शिकवूनही नच कधीं येअील आचारितां.
प्रीती राहिल काय संशय मला प्रीतीस संस्कारितां
जाणें अेक विशुद्ध भाव दुसरें नाहीं मला माहिती.

मी प्रीतीस तुझ्या न योग्य कळतें, आतां मला शोभने,
माझ्या अंतरिं भाव सुंदर परी येती न ते दावितां.
माझी अुत्कटता असह्य, नडते माझीच सापेक्षता
प्रीतीवांचुन मी जगांत जगुनी दावीन माझें जिणें.

या जन्मीं न पुनश्च याचिन तुला, होअूं नको कातर
मी बाळांवर प्रेम या करिन मी प्रीती निसर्गावर.

★

# हा धुंद वैश्वानर–

ही माझी मिथिला समोर जळतां माझी म्हणूं मी कशी ?
ही माझी मिथिला समोर जळतां मिथ्या म्हणूं मी कशी ?
ज्वालांच्या जणुं नर्तनांत रमली, स्वप्नांत मी पाहतों
कीं सोडून पुरूरव्यास विरहीं व्योमीं निघे अूर्वशी.

हे प्रासाद–विलास, भोग रतले ज्यांच्यांत रात्रंदिनीं
तो आतां अनलीं अनंग जळतो शोकामध्यें लोळुनी.
इच्छा आणिक वासनाच जणुं या-हा लोक आक्रोशतो
पेटे हा अभिमान - दीप्ति अुठली या चंद्रशालांतुनी.

हें सामर्थ्य – तृणापरी जळतसे दुर्लंघ्य हा डोंगर
आशा ही – धग लागुनीच जळती हे कुंज चेतोहर
होअी तप्त नदी, सरोवर कढे, हो क्रुद्ध किंवा क्षमा
संपे. या कळसामधून प्रकटे हा धुंद वैश्वानर.

आहें मीहि विदेह, शांत बघतों हें अग्निचें वादळ
प्रज्ञा हो स्थिर ही परंतु नयनीं धूमामुळें ये जळ !

★

# सखि हा धुंद हुताशन गे

हे सुटणारे बंध न पोरी
हे तुटणारे पाश न गे
प्रदीप्त झाल्यावरी विझेना
सखि हा धुंद हुताशन गे.

तूं ओठांनीं वदसी भलतें
ओष्ठ न वाणीस्तव प्रणयीं
शब्द अेकही कसा न अुमटे
तुझिया हृदयापासुनि गे ?

या अग्नीनें जळशिल पोरी
आणिक अेक दिनीं केव्हां
अुठेल ज्वाला वातावरणीं
आकाशाला ग्रासुन गे.

जळेन मीही, तुज मज राहिल
अन्य न शोकावांचुनि गे
हृदयामधलें स्त्रवुं दे अमृत
तोंवर ओष्ठद्वयांतुन गे.

★

# परंतु

वळणावरतीं वळलों जों मी
अभी समोरच तों तूं अवचित
क्षणार्ध फुललें तुझिया ओठीं
तें पूर्वीचें मधुमंदस्मित.

क्षणार्ध अेकच मला न कळतां
माझे ओठहि विलग जाहले
हास्य न आलें ओठांवर तों
तूं अपुलें मधुस्मित आवरलें.

आवरलें स्मित आणिक तत्क्षण
नजर आपुली वळविलीस तूं
आवरलें जें आलें ओठीं
आवरलें सारेंच . . . परंतु . .

★

# नांव तुझें काढितां

नांव तुझें काढितां कां घाव तो होओी मला ?
काव्य तुझें वाचितां माझ्या सलें कां अंतरीं ?
संपलें सारेंच आतां ! ती कुठें गेली अुषा !
राहिल्या मागें स्मृती – तारांकिता ही शर्वरी.

भावनांचा खेळ झाला आणि मी बाजी हरे
प्रेम ही बाजी न केव्हां मानिलेली मीं जरी.
जिंकिलें तूं – जिंकणाराच्या मला ठाव्या कळा
हारलों मी – या जिताची संपली ना माधुरी.

मी न भिक्षा मागणारा – मागतों कांहीं न मी
मानभंगाचेंच आतां शल्य या माझ्या अुरीं.
अमृताचा कुंभ मी तूझ्या पुढारीं ठेविला
तूं पदाघातें दिला लोटून तो या भूवरीं.

घाव हा साहीन मी यानें जरी घायाळ हो
का तुला द्यावें असें तूंतें नको जें मी तरी ?
जीवनाला गे त्वरा मृत्यूपरी – मी चाललों
ही निरोपाची घडी – भेटूं कधीं कालांतरीं.

★

# पुनश्च तूंच ?

येसी काय पुनश्च तूंच जहरी द्याया मनोवेदना ?
हा! दुर्दैव अखेर तूंच उठसी का मंथनांतून या ?
येसी लालस रूप घेऊन नवें, माझीच तूं लालसा
तूं माझा अतिथी हलाहल असो मी सिद्ध आलिंगना.

लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक, सुरा यांतील यावें कुणी
देशी तूं विषयुक्त मद्य पुढती, तृष्णेंत मी व्याकुळे
देशी तूं विषकन्यकाच मजला आव्हानुनी पौरुषा
आहे रत्न फुलांतही मजसि का ज्वालाच रे प्राक्तनीं.

ये तूं जाळित भावना – जळत ये या सिंधु पृष्ठांतुनी
ये तूं जाळित स्वप्न धुंद तरळें निद्रेंत जें माझिया
ये तूं जाळित चारुता – ज्वलित हो – जें जाळण्या योग्य तें
ये तूं जाळित जीवना – जळत मी रे रोमरंध्रांतुनी.

भाळीं चंद्र न माझिया, नच उठे गंगौघ केशांतुनी
मी कंठस्थ तुला करीन, उठुं दे ज्वाला शरीरांतुनी.

★

# तुझें नि माझें व्हावें मीलन

तुझें नि माझें व्हावें मीलन
रुचें न या वसुधेला ग
मृग नयनांतिल अश्रूवांचुन
गंध न या मातीला ग.

तुझें नि माझें व्हावें मीलन
मान्य न या वायूला ग
विरहीं निःश्वासाविण त्याच्या
हृदयिं न पेटे ज्वाला ग.

तुझें नि माझें व्हावें मीलन
रुचे न हें सिंधूला ग
निज हृदयापरि तळमळणारा
संग हवा दुःखाला ग.

तुझें नि माझें व्हावें मीलन
मान्य न हें व्योमाला ग
विरहावांचुन मोजिल तारे
वेडा कोण कशाला ग.

तुझें नि माझ्ञ व्हावें मीलन
रुचें न हें रजनीला ग
अर्घ्य हवे तिज नयनांमधले
जागृत मध्य-निशेला ग.

तुझें नि माझें व्हावें मीलन
मान्य न हें मृत्यूला ग
भय त्याला हें मृत्यूवांचुन
भोगूं स्वर्भोगाला ग.

तुझें नि माझें व्हावें मीलन
सह्य न हें नियतीला ग
तिच्या सुनीतामधला अंतिम
चरण असे लिहिलेला ग.

★

# सांगा ना

“ सांगा ना कविता कशी जुळवितां ? येती कसे भाव हे ?
येती हे अनुरूप शब्द कुठुनी ? सांगा रहस्यार्थ ना
मातें ही शिकवा कला,” सखि कुठें सांगून हें काव्य ये ?
का गालावरचीं स्मितें शिकवुनी येतील देतां कुणां ?

दृक्क्षेपें तुझिया अनंत कविता माझ्या स्फुरे अंतरीं
हें नेत्रद्वय अन् कपोल यमकें कीं साधिलीं सारखीं.
ओठाची अधरास अेक अुपमा, हें हास्य प्रासापरी.
नासा ही तर गे अनन्वय असे – नाहीं कुणासारखी.

अुत्प्रेक्षेपरि केशभार, तुझिया दृष्टींत आहे ध्वनी.
दृष्टान्तापरि वक्षभाग गमतो, भ्रूभंग श्लेषार्थ दे.
हा दैवी विलसे प्रसाद तुझिया गौरांग कांतींतुनी
आहे हंसगती अपह्नुति, तुझ्या रूपामधीं रूपकें.

आहे का हृदयांत प्रीत ? तर गे अर्थांतरन्यास हा
काव्याचा न मिळे रसग्रह मला हें दैव माझें पहा !

★

# दिनयामिनी

करितों दिवसा रात्रीं कधिही
तुझेंच चिंतन
तुझेंच दर्शन.

या चंद्राची बघतां सुषमा
तुझी आठवण
तुझेंच दर्शन

परंतु या चंद्राला सुमुखी
तुझें सुहास्य न
तुझें न दर्शन.

या वायूच्या लहरीमाजीं
तुझेंच स्पंदन
तुझेंच स्पर्शन

परंतु या वायूमधिं कोठें
तुझें न जीवन
तुझें न दर्शन.

मी शुक्राचा बघतों तारा
तुझेच लोचन
तुझेंच दर्शन

बुलबुल

परंतु या तेजामधि कोठें
ते करुणाधन ?
तुझें न दर्शन.

उषेस बघुनी मला स्मरावें
तुझेंच आनन
तुझेंच दर्शन

निटिलावरती परी उषेच्या
तुझें सुकेश न
तुझें न दर्शन.

फिरतों विरहीं मी एकाकी
असाच उन्मन
कुठून मीलन ?

मला कळे ना माझें कांहीं
कळें न प्राक्तन
तुझें न दर्शन.

तुझें न लोचन
तुझें न आनन
तुझें न स्पर्शन
तुझें न दर्शन.

★

# कमलामधुनी भ्रमर उठेना

नाजुक डोळे, नाजुक कांती
नाजुकता क च पा शा व र ती.
उत्सुकता ओठांवर नाजुक
भ्रूभंगांतहि नाजुकता ती.

गालांवरतीं हंसरें मार्दव
नासेवरतीं कोमल आर्जव
वक्षावर तारुण्य उसासे
मुद्रेवरतीं अजुनी शैशव.

या भुवयांच्या वक्र धनूला
नासेचा शर सरल योजिला
बघणाऱ्याला न लक्षतां तूं
शरावांचुनी आणि विंधिला.

नाजुकतेचा बंध तुटेना
कमलामधुनी भ्रमर उठेना
मधुकोषांतिल मधु संपेना
हा मरणाचा छंद सुटेना.

★

# पीत जर्द नागीण

स्वरुप कांतिचा झळाळ नाचे फिकेच माणिक, मोति, हिरे
स्वप्नापरि जग भासे बघतां राजिव लोचन हे गहिरे.

पुष्ट, धुंद घवघवीत अवयव मुसमुस नाचे वर नवती
मस्त कसा भोगी सुख लोळत, बुचडा हा मानेवरती
कटयार नेत्रांची लखलखता लोळण घेती वीर पदीं
रसरसलेले पयोद बघुनी कामि जिवाची प्यास हरे.

मुद्रेवरतीं हास्य नाचरे मोहजाल जणुं मदनाचें
विभ्रम नाजुक भ्रम निर्मी हा रोमरोमामधि मद नाचे
प्रतिक्षणाला लेई नवता स्वरूप तुझ्या सखि वदनाचें
कुणा कवीची कविता जणुं ही शृंगारिक करिते नखरे.

पीत जर्द नागीण डंखते सहज हंसत कितिकांस उरीं
कैफ चढुन एकादा घाली मणी खुडाया हात शिरीं
तनुपाशामधि झुलवी त्याला चढवी वळसे ही जहरी
श्याम कुणी नाचे शीर्षावर जो न कधीं रतियुद्ध हरे.

★

# या मातीला असेल आत्मा ?

या मातीला असेल आत्मा ? असेल पुनरुत्थान कधीं ?
मृत्यूच्या शून्यांतहि जाणिव अस्तित्वाची राहिल का ?
असे असेलच तर सखि मजला तुज विस्मरतां येइल का ?
शरद कौमुदींतुन उठलेलें स्मित सखि मी विसरेन कधीं ?

मी विसरेन कसा ? निशिगंधामधुनी उमलत शब्द तुझा !
मी विसरेन ? उष:स्वप्नांतुन कोमलता घे स्पर्श तुझा !
धुंद कशी ये विस्मरता तव केशांतिल गंधामधली ?
मृदुता विस्मरतां येइल का तुझिया नेत्रद्वयामधली ?

मी विसरेन कशी ती लज्जा, लालस, कोमल, गाढ मिठी ?
मृत्यूच्या स्वप्नांत तरल हें स्वप्न विरल होईलच का ?
आणि वेदना चिरविरहाच्या अंतर्यामीं या जळती
मृत्यूच्या निद्रेंत तयांना निद्रा क्षणभर येइल का ?

★

# दे मज ती अभिरामा !

तुझ्या चिंतनावांचुन कांहीं सुचे न मज दिनरातीं
निशेंत रंगे उषा नि चंद्रम दिवसां व्योमललाटीं.
मला कशाला चिंता आतां काय व्हायचें अंतीं
मी न मोजितों तारे किंवा मी न मोजितों प्रीती.

मला खुळा म्हण – धनद्रव्यावर मी न असें जगणारा
त्याहुन आहे प्रियतर मजला तुझीच कांचनकांति
तुझिया नामामधिं मज वाटे कांहीं अद्‌भुत जादू
या नांवास्तव आज हवीतर उधळुन देइन कीर्ति.

मी होउन नागीण डंखिली माझ्या क्षुब्ध उराला
मी होउन ही धार वेधिली माझ्या वक्षावरतीं
मीच पुढें धावून झेलिली विद्युत या बाहूंनीं
तूं वा मृत्यू वांचुन आतां कोण मला सांगाती ?

या जन्मीं जर योग नसेलच तर माझ्या हे नियती !
या देहाची फिरून एकदां तुडवच तूं जलमाती
कैवल्यच ती, तिज वाचुन मी जाणार न विश्रामा
फिरून एकदां दे हे काळिज, दे मज ती अभिरामा.

★

# ही जीवनाची गती

धन्वी त्या पुरुषोत्तमासहि कसें क्लीबत्व ये शेवटीं ?
इंद्राचे व्यभिचार त्यास शरिरीं देती हजारों भगें.
हा द्यूतांत हरे, युधिष्ठिर तरी लावी पणा द्रौपदी
सांगे धर्म अधर्म लाजत, ' नरो वा कुंजरो वा ' म्हणे.

कृष्णाचा पडतां प्रसंग फिरला चक्रासवें शब्दही
कृष्णाचे सुत मद्यधुंद कलहें नेती कुलाला लया.
पांचाली क्षणमात्र का नच परी कर्णास वांच्छी मनीं
दे कौमार्य न अर्घ्य देई जणुं ही कुंती स्वतः भास्करा.

बुद्धाचा हतबुद्ध संयम ठरे, मांसाशनानें मरे
विश्वामित्र खुशाल हाड चघळी कोणी असो श्वानही.
ब्रह्मानें निज निर्मितीस चळतां भोगूं नये काय हो ?
झाडा आड लपून राम कपटें वालीस वेधी अरे !

श्रद्धा, पौरुष, नीति, संयम ढळे ही जीवनाची गती !
हें आकर्षण बंधनांत अवघे आक्रोशती, नाचती !

★

बलबुल

# तूं मी मीलित व्हावें :

तूं मी मीलित व्हावें
हें नियतीस न साहे

तर होउन ये वायू
गंधित, तरल, क्षणायू

तूं दैवीं न सुगंधा
तर ये क्षण निशिगंधा

निशेस या उमलावें
तूं मी मीलित व्हावें.

तूं प्रमदा अनुरागी
जर माझ्या नच भाग्यीं

रागिणि हो तरलांगी
वेढुन मज सर्वांगीं

हृदयामाजि रिघावें
तूं मी मीलित व्हावें.

ये स्वप्निल मधुराणी
स्वप्नांची अधिराणी

ये जागृत असतांना
मधु ही कटु घेतांना
तूं जिव्हेंत विरावें
तूं मी मीलित व्हावें.

तूं प्रियदर्शन राणी
नच दैवांत हिमानी
आदर्शांत हिमांच्या
उसळत कांति उषांच्या
या शोभेंत दिसावें
तूं मी मीलित व्हावें.

चुंबन कोठुन ओठीं
स्पर्श न जेथ ललाटीं
तर माझ्या सखि ये तूं
पूर्णालिंगन मृत्यू
मीलन होत निमावें
तूं मी मीलित व्हावें.

★

# गंध नको निश्वासूं

बकुळीच्या शुष्क फुला
अजुनी कां गंध तुला ?
अजुनी कां निश्वासत
हृदयांतिल शोक खुळा ?

विरलेलें स्वप्न धुंद
अजुनी तुज आठवते ?
कालवती हृदयांमधि
गंधामधली गीतें ?

संपलेंच सारे पण –
स्वप्न तुझें संपेना
संपेना गं धा ति ल
आर्त, मुग्ध ही करुणा.

स्मरतो तुज गौरीचा
केशपाश धुंद, श्याम ?
सय येतां गं धा चा –
थरथरतो रोम रोम.

स्मरते तुज ती संध्या
तो क्षण सावेग मत्त ?
पा य त ळीं ग ळ णा रे
ते प रा ग शापभ्रष्ट ?

थरथरला ओ ठा व र
क्षण विरही – पण अनंत
च प ले च्या पं खां नीं
आक्रमिला व्यो म पं थ.

गंध नको निश्वासूं
थांबव हे आर्तगीत
काळजांत शल्य सले
तुजला माहीत प्रीत !

★

# कलावती तूं कलहंसी

तुझा नि माझा झाला सौदा
प्रीतीचा भर हाटीं ग
द्रव्यावर लावण्य भाळतें
प्रीत असे उफराटी ग.

प्रीत असे उफराटी पण गे
कलावती तूं कलहंसी
कुण्या कुलवतीहून सखी तव
अव्यभिचारी प्रीती ग.

विषय विषानें रसरसलेले
तीर धुंद तव नजरेचे
काजळांत माखून वेधिले
काळजांत मजसाठीं ग.

कमर अशी मुरडून लचकली
नागिण पिवळी घे वळसा
नासेच्या थरथरत पाकळ्या
भिवई उंच ललाटीं ग.

मी माझ्या हातांनीं केला
सैल पिसारा केशांचा
कुलयुवतीची लाज प्राशिली
मीं तुझिया सखि ओठीं ग.

चुरे मोगरी वक्षावरती
गंध दाटला सर्वांगीं
तुच्छ लेखिलें जग मातीचें
स्वर्ग मिळाला हातीं ग.

अन् जातांना मिठींत कवळुन
म्हणे 'श्याम येशील कधीं ?'
वाट पाहसी भोळचा राधे
निशिदिन यमुना काठीं ग.

★

# सौंदर्या !

तें चांचल्य उरे न आज, नुरली ती प्रीत डोळ्यांतली
त्या लाडीक, सुडौल, गोड हनुची आतां नुरे चारुता
या हास्यामधुनी न सांडत प्रभा, गालीं उठेना खळी
नासेंतील न आज आर्जव दिसे, ओठीं न शालीनता.

कांतींतून उठे न यौवन अतां, हा साज बाकी उरे
गेले मौक्तिक ते कुठें न कळलें, हातीं तुझ्या शिंपली.
याची जाणिवही तुला न बघुनी काळीज माझें चुरें
जातांना दिसली न काय तुजला ती दीपमाला जळीं ?

गेलें त्यास्तव मात्र मी झुरतसे, तें स्वप्न माझें कुठें ?
आतां स्वप्न मिळेल काय मज तें गे कालनिद्रेंतही ?
मी धारेवर वाहतों, न दिसते ती दीपमाला कुठें.
ती शून्यांत उषा विलीन, बघतों मी व्यर्थ शून्यांतही !

माझें प्रेय मिळेल काय मजला त्या पुंडरीकापरी ?
सौंदर्या ! जळतो तुझ्यास्तव उरीं, मी जन्मजन्मांतरीं.

★

# तें स्वप्निल सौंदर्य हवें

आज अचानक तुझी आठवण
हृदय विदारित आली ग
हृदयामधला शूल हलवुनी
अश्रुजळानें न्हाली ग –

एक वेदना हृदयीं माझ्या
एक वासना जळती ग
रोष कशाचा ? कटुता कसली ?
मीलन नव्हतें भाळीं ग –

सौंदर्याचा तुझ्या ऋणी मी
तूं मजला सखि स्वप्न दिलें
या स्वप्नानें व्योम दिलें मज
इंद्रचाप आभाळीं ग –

या स्वप्नांना मृत्यू नसे ग
नच मातीचा स्पर्शहि या
ही तर माझ्या आत्म्याच्या सखि
दाहांतून निघाली ग –

शाप असे पण या स्वप्नांना
दाह असे सखि शीतल हा
शल्य राहिलें रुतुन, वेदना
वरुनी सर्व निमाली ग --

या स्वप्नांना मुक्ति हवी तर
तें स्वप्निल सौंदर्य हवें
तें न मिळे, या चिर स्वप्नांची
संगत मर्जास मिळाली ग --

★

# कितीक वळणें वळलों !

कितीक वळणें वळलों तरिही दैव न माझें वळलें रे !
कितीक मरणें जगलों तरिही श्रेय न मज आकळलें रे

भोगामधुनी, त्यागामधुनी, सुखदुःखांतुन एक व्यथा
सौंदर्यानें, स्नेहप्रीतिनें अंतर माझें जळलें रे

माझें नसतां कांहिच कोठें 'माझें माझें' मी म्हटलें
हातांमधले सिकिताकण ते बघतां बघतां गळले रे

मीं केलीं शून्यांचीं गणितें शून्य उणें हातीं माझ्या
नियतीनें झुलवून श्रमविलें, वाया मजला छळिलें रे

काय कुणाचें मी देणारा ? मी नेणार नसें कांहीं
इथें तुडवितों निरर्थ माती, अंग तियेनें मळलें रे

या सुरईवर गूढ गीत हें अर्थ तयाचा उकलेना
मात्र तयांतिल पय प्राशुनियां मस्तक माझें भ्रमलें रे

ऐलतिरावर, पैलतिरावर श्रेय नसे, मन गोंधळलें
कुठें न कांहीं माझें कळलें, कळलें तरि मन चळलें रे !

★

# निष्पथ यात्री

जीवन माझें म्हणजे स्वप्नें दिन रात्रीचीं
कोठें पडतात पदें या नि ष्प थ यात्रीचीं ?

रात्रीच्या स्वप्नाला मीच हंसे भर दिवसा
जीवनकलहासाठीं होतों मी क्षुद्र, पिसा
काय निशा स्वप्नांना ज्ञात असे वास्तवता ?
धनद्रव्यावर जगते हळवी काव्यात्मकता.

धनद्रव्यासाठीं या मुखवटा, सुवेश हवा
लोभ हवा, द्वेष हवा, आर्जव अन् दंभ हवा
खोटी अनुभूति हवी, खोटें मृदु हास्य हवें
जिव्हेवर मधु हवाच, हृदयांमधि जहर हवें.

जीवन माझें म्हणजे स्वप्नें दिनरात्रीचीं
कोठें पडतात पदें या नि ष्प थ यात्रीचीं ?

रात्रीच्या स्वप्नाला तारांकित व्योम निळें
रात्रीच्या स्वप्नांमधिं दिवसाचें स्वप्न जळें
धूपापरि निश्वासत गंध उठे काव्यात्मा
स्वप्नापरि तरल, धुंद स्पर्शी स्वप्निल व्योमा.

चांदण्यांत न्हात, गात नाचे हा पूर्ण नग्न
व्योमाशीं कुजबुजतो हा स्वतःमधेंच मग्न
क्षितिजांना धरुन करीं, कवळी हा गंधवती
तिचिया मधु गंधानें यांच्या हृदयीं शांती.

प्राचीला पुसतो हा 'केव्हां येणार उषा'
याच्या निद्रेसाठीं सोडी कचबंध निशा
जीवन माझें म्हणजे स्वप्नें दिनरात्रीचीं
कोठें पडतात पदें या नि ष्प थ यात्रीचीं.

★

बुलबुल

# एक मला दिन असा मिळावा–

एक मला दिन असा मिळावा निशोस पाटल रंग हवा
उषा फुलावी अवघ्या व्योमीं आणि तिच्या उरिं गंध हवा.
एक मला दिन असा मिळावा या ताऱ्यांना गीत हवे
आणि फुलांमधि गुरुशुक्राचे रसरसणारे तेज हवे.

एक मला दिन असा मिळावा रमणी–हृदयीं प्रीत हवी
सौंदर्याला अनंत आत्मा, प्रज्ञाही सौंदर्यमयी.
एक मला दिन असा मिळावा श्रमामधें सन्मान हवा
कवितेच्या चरणाचरणाला विभ्रम, भृकुटीभंग हवा.

एक मला दिन असा मिळावा या तरुला फलभार हवा
सर्व मिळावें हृदयस्थाला, सर्वस्वाला अंत हवा.
निःसंगाचा संग हवा मज अन् संगामधि रंग हवा
मृत्यूमधि रतिरंग हवा मज आणिक नंतर जन्म हवा.

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम क्रमांक २३०२८ वि: ...
७३८५ नों: दि: २-५-३-५८

# संपूं दे

शब्दांतिल संपूं दे अर्थ अतां
अंगांतिल संपूं दे स्पर्श अतां
संपूं दे डोळ्यांतिल दृश्यहि गे
हृदयांतिल संपव अदृष्टहि गे.

सुख म्हणजे लहर अेक या शरिरीं
दुःख–अेक लाट धुंद अन् जहरी
रस तूं मज जो दिलास प्यालों मी
थरथरलों, हंसलों, रडलों, क्षण मी.

संपूं दे धुंदींतिल आर्त व्यथा
संपूं दे निद्रेंतिल स्वप्न अतां
माझ्यांतिल थांबव सखि कंपन हें
बक्षावर दे मज विश्राम सदा.

★

# मी सिद्ध यात्री

प्रीती दिली तूं दिलें का न तूं प्रेय ?
तृष्णा दिली तूं दिलें का न तूं पेय ?
इच्छा दिली तूं दिलें का न तूं दैव ?
भोगीन देशील तें मी सुखेनैव !

९०४ ६२

भोगांतलें आज कांहीं न हातीं
शोकाविना अन्य देई न प्रीती
कर्मांत संपे न माझी अशांती
धर्मांत लाभेल का श्रेय, शांती ?

कांहीं दिसेना मला मार्ग – दिङ्मूढ.
तूं सांग मित्रा तमिस्त्रेतलें गूढ
हातांत घे उंच तेजाळ ज्योती
दे हात हातांत मी सिद्ध यात्री.

REFBK-0010562
REFBK-0010562